# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

▶ वर्ष–३

■ अंक–१३

दिवा न्यूज

आता डिजिटल स्वरुपात...

दिवा न्यूजची वेबसाईट सुरु..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com

■ epaper.diwanews.com ■ सोमवार, ३० ऑक्टोबर २०२३ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 ■ www.diwanews.com


# आता दिवा शहरासाठी लढायचे आहे

## ठाकरेंच्या शिवसेनेचे रोहिदास मुंडे यांचा एल्गार

**“ मी दिव्याच्या प्रश्नांवर लढत असताना मला ठरवून बाजूला केलं गेलं, ज्या शिंदे गटामुळे दिव्यातील प्रश्न प्रलंबित आहेत, त्यांच्या विरोधात जनतेचा आवाज बुलंद करणार**


रोहिदास मुंडे

**“ दिवावासीयांचे प्रश्न निडरपणे मांडता यावेत यासाठीच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला**

१. दिव्यात शिंदे गटाची एकहाती सत्ता असल्याने सामान्य माणसाचे प्रश्न सुटत नाहीत

२. लोक जिकडे सत्ता त्या पक्षात जातात,मी सत्ता नसलेल्या परंतु जनतेसाठी लढणाऱ्या ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश केला

३. मला कोणत्याही पदाची अपेक्षा नाही,फक्त दिव्यातील जनतेसाठी मोकळेपणाने लढता यावे हीच भूमिका

४. पाणी प्रश्न हा महत्त्वाचा, पण गेली १५ वर्षे पाणी प्रश्न सुटू शकला नाही

**भाजपचे माजी मंडळ अध्यक्ष आणि नुकतेच ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश केलेले दिव्यातील आक्रमक नेतृत्व रोहिदास मुंडे यांची दिवा न्यूजचे संपादक सुहास खंडागळे यांनी विशेष मुलाखत घेतली. या मुलाखतीत रोहिदास मुंडे यांनी सर्व प्रश्नांना रोखठोक उत्तर देत येणाऱ्या काळात आपण दिवावासियांसाठी लढणार..असा निर्धार व्यक्त केला. रोहिदास मुंडेंची संपूर्ण मुलाखत प्रसिद्ध करत आहोत.**

**प्रश्नः–तुम्ही भाजप का सोडली?**

रोहिदास मुंडेः–मी भाजप सोडावी अशी स्थिती निर्माण केली गेली. मुळात मी ज्या शिंदे गटविरोधात मागील अनेक वर्षे लढत आहे त्यांच्या विरोधात शांत बसावे याच उद्देशाने नव्या अध्यक्षांनी मला बाजूला केलं. माजी अध्यक्ष डावखरे साहेब आणि आमदार केळकर साहेब यांनी शिंदे गटविरोधात दिव्यातील समस्यांबाबत लढण्यासाठी मला सहकार्य केलं होतं... पण आता शिंदे गटाच्या इशाऱ्यावर चालणारे नेतृत्व भाजपकडे आहे.मुळात दिव्यात भाजप का वाढली?याचा विचार आताच्या नेतृत्वाने केला नाही.दिव्यातील समस्यांवर सक्षम विरोधी पक्ष म्हणून आवाज उठवल्याने दिव्यात भाजप वाढली.जर दिव्यातील समस्यांवर प्रश्नच विचारायचे नसतील तर तिथं राहून फायदा काय?

**प्रश्नः–तुम्ही भाजप सोडल्यावर तुमच्या पक्षातील लोकांनी फटाके फोडले...**

रोहिदास मुंडेः–त्यांना कल्पना नाही भविष्यात त्यांचे फटाके फुटणार आहेत...भाजप मधील काही स्थानिक नेत्यांना कळलंच नाही शिंदे गटाने भाजप मध्ये अंतर्गत भांडणे लावून भाजप संघटना खिळखिळी केली. जाऊ द्या... त्यांना त्यांच्या हाल वर सोडून देऊ.माझ्यावर ज्यांना टीका करायची आहे त्यांना करू द्या... सत्तेत एकत्र असल्याने मला दिव्यातील प्रश्नावर आक्रमक पणे बोलण्यास विरोध केला गेला मग आता भाजप आणि शिंदे गटाने सत्तेच्या माध्यमातून दिव्याचे प्रश्न सोडवावेत.

**प्रश्नः–उद्धव ठाकरे तर सत्तेत नाहीत,त्यांच्याकडे पक्ष आणि चिन्ह देखील नाही तरीही तुम्हाला ठाकरेंच्या शिवसेनेत जावं का वाटलं?**

रोहिदास मुंडेः– त्यांच्याकडे सामान्य माणसासाठी लढण्याची प्रचंड ऊर्जा आहे. आज सगळेच सत्तेत असताना सामान्य जनतेचा आवाज फक्त उद्धव ठाकरे आहेत.दिव्यात विरोधी पक्ष नसेल तर येथील जनतेचे प्रश्न सुटणार नाहीत.शिंदे गटाच्या मनमानी कारभार विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हा पक्ष उत्तम पर्याय आहे.दिव्यात एकहाती सत्ता असल्याने सामान्य माणसाचे प्रश्न सुटत नाहीत. दिवा वासीयांचे प्रश्न निडरपणे मांडता यावेत यासाठीच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात मी प्रवेश केला...मी सर्वसामान्य कुटुंबातील सामान्य माणूस आहे.पण माझ्या लढाऊ वृत्तीला शिवसेनेत जागा आहे.मला दिव्यातील जनतेचे प्रश्न मांडण्याची संधी उद्धव साहेबांनी दिली आहे.

**प्रश्नः–तुम्ही तिकडे मंडळ अध्यक्ष होतात, इकडे तुमच्यावर काही पदाधिकारी नाराज आहेत असा आरोप विरोधक करतात...**

रोहिदास मुंडेः–असा संभ्रम निर्माण करूनच विरोधकांनी दिव्यातील भाजप कमकुवत केली. शिवसैनिक अशा संभ्रमाला बळी पडणार नाहीत.विरोधक समोरासमोर लढू शकत नाहीत मग पक्षात मतभेद निर्माण करायचे ही त्यांची रणनीती आहे.पण माझ्यावर कोणीही नाराज नाही.

(पान २ वर)

दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

सोमवार, दि.३० ऑक्टोबर २०२३



## राज्यातील तीन हजार अंगणवाडी मदतनीसांना मिळणार पदोन्नती

**मुंबई :** केंद्र सरकारच्या मदतीने राज्य शासन विविध योजनांच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करीत आहे. राज्यातील तीन हजार अंगणवाडी मदतनीस यांना अंगणवाडी सेविका पदावर पदोन्नती देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते राज्यातील प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेतील ८,१४,००० मातांना ३२१ कोटी ५७ लाख रुपयांचे ऑनलाइन वितरण करण्यात आले. यशवंतराव चव्हाण सेंटर येथे केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री शिंदे बोलत होते.



**दिव्यातील विठ्ठल रुक्मिणी सहकारी पतपेढी लि. उल्हासनगरच्या दिवा शाखेचा सातवा वर्धापन दिन उत्साहात साजरा झाला. सातवा वर्धापन दिन साजरा झाला. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गेनबा जगन्नाथ मांढरे, संचालक प्रकाश पाटील, संस्थेचे कार्यकर्ते शंकर काका पाटील उपस्थित होते. त्याचबरोबर सभासद, संस्थेचे अधिकारी कर्मचारी व दैनंदिन ठेव प्रतिनिधी देखील उपस्थित होते.**

## मुंबई विभाग शालेय स्पर्धेत ठाण्याला १३ पदके

ठाणे: मुंबईतील सोमय्या महाविद्यालय येथे २१ आणि २२ ऑक्टोबर दरम्यान पार पडलेल्या मुंबई विभाग शालेय स्पर्धेत ठाणे महापालिकेच्या प्रशिक्षण योजनेअंतर्गत दादोजी कोंडदेव येथे सराव करणाऱ्या खेळाडूंनी ४ सुवर्ण पदकासह अन्य ९ अशा १३ पदके जिंकली आहे. तसेच येत्या २९ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत चंद्रपूर येथे होणाऱ्या महाराष्ट्र राज्य शालेय स्पर्धेत सहा खेळाडू पात्र ठरले आहेत. अशी माहिती प्रशिक्षक नीलेश पाटकर यांनी दिली. रिसा फर्नांडिस हिने १४ वर्षाखालील मुलींच्या गटात २०० मीटर स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. मिहिका सुर्वे हिने १७ वर्षांखालील मुलींच्या गटात १०० मीटर स्पर्धेत सुवर्णपदक तर २०० मीटर आणि ४०० मीटर स्पर्धेत रौप्यपदकावर समाधान मानावे लागले आहे. नतालिया फर्नांडिस हिने १७ वर्षांखालील मुलींच्या गटात ४०० मीटर अडथळा शर्यतीत रौप्यपदक जिंकले. झोया शेख हिने १७ वर्षांखालील मुलींच्या गटात ४०० मीटर आणि ४०० मीटर अडथळा शर्यतीत कांस्यपदकांची कमाई केली. तर गिरिक बंगेरा याने १७ वर्षांखालील मुलांच्या गटात ८०० मीटरमध्ये रौप्यपदक जिंकले. अथर्व साळुंखे याने १७ वर्षांखालील मुलांच्या गटात ११० मीटर अडथळा शर्यतीत कांस्यपदक पटकावले. अली शेख याने १९ वर्षांखालील मुलांच्या गटात ४०० मीटर अडथळा शर्यतीत सुवर्णपदक आणि ४०० मीटरमध्ये कांस्यपदक नावावर केले. ऋषभ यादव याने १९ वर्षांखालील मुलांच्या गटात ११० मीटर अडथळा शर्यतीत सुवर्णपदक आणि ४०० मीटर अडथळा शर्यतीत कांस्यपदक जिंकले. या खेळाडूंपैकी रिसा फर्नांडिस, मिहिका सुर्वे, नतालिया फर्नांडिस , गिरिक बंगेरा , अली शेख आणि ऋषभ यादव हे खेळाडू चंद्रपूर येथे होणाऱ्या महाराष्ट्र राज्य शालेय स्पर्धेत पात्र ठरले आहेत.



### चार सुवर्ण पदकांचा समावेश सहा खेळाडू ठरले राज्य शालेय स्पर्धेसाठी पात्र

## आता दिवा शहरासाठी लढायचे आहे-रोहिदास मुंडे

**(पान १ वरून)**

नाराज होण्यासाठी मी काही केलंच नाही तर हा प्रश्न येतो कुठे?मला उद्धव साहेबांनी पक्षात प्रवेश दिला.जिल्हाप्रमुख थरवलसाहेब,संपर्क प्रमुख खोत साहेब,आमचे नेते सुभाष भोईर साहेब,उपशहर प्रमुख सचिन पाटील साहेब,नाईक साहेब या सर्वांच्या सहकार्याने आता दिव्यासाठी लढायचे आहे.

**प्रश्न:-दिव्यासाठी लढणार म्हणजे काय करणार?**

**रोहिदास मुंडे:-**दिव्यातील जनतेला भेडसावणाऱ्या समस्यांवर आता शिवसेना स्टाईलने आवाज उठवणार.मागील १५ वर्षे पाणी प्रश्न सुटला नाही.कचरा समस्या,आरोग्य समस्या,पायाभूत सुविधा, नागरी सुविधा या सर्वच प्रश्नांवर लढावं लागणार आहे.मुख्यमंत्री उदघाटन करून गेले पण दिव्याला पाणी नाही..मग उदघाटन कसले केले?फक्त टेंडर काढून कामे झाली म्हणून सांगता पण त्या कामांचा येथील जनतेला फायदा होत नसेल तर उपयोग काय?दिव्यात टँकर लॉबीला पाणी मिळते पण जनतेला पाणी मिळत नाही...दिव्यात पाच लाख हिंदू राहतात मग या हिंदूंना पुरेसे पाणी तुम्ही देत नसाल तर तुम्ही हिंदू विरोधी नाही का?दिव्यात राहणारी जनता हिंदू आहे...मग येथील जनतेला ज्या समस्या रोज भेडसावत असतात त्या तुम्ही सोडवत नसाल तर तुमच्या विरोधात बोलायचे नाही का?मला कोणत्याही पदाची अपेक्षा नाही,दिव्यातील जनतेसाठी आता लढायचे आहे.

**प्रश्न:-आगामी काळातील वाटचाल कशी असेल?**

**रोहिदास मुंडे:-**शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या अन्यायाविरुद्ध संघर्ष या विचाराने प्रेरित होऊन मी शिवसेनेत दाखल झालो आहे. दिवा शहरावर अन्याय होत आहे,याविरोधात शिवसेना स्टाईलने यापुढे आंदोलने होतील. जनतेसाठी सर्व शिवसैनिक आम्ही मैदानात उतरू... दिव्यातील नेते शिंदे गटात गेले असतील पण बाळासाहेबांना मानणारा शिवसैनिक आजही उद्धव साहेबांसोबत आहे हे आपण लोकांमध्ये फिरल्यावर दिसते.त्यामुळे दिव्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मोठं यश मिळेल यात शंका नाही..!

**प्रश्न:-तुम्ही काल परवा शिवसैनिक झालात असा आरोप तुमच्यावर शिंदेंच्या शिवसेनेचे काही लोक करतात...**

**रोहिदास मुंडे:-**त्यांना राजकीय अक्कल कमी आहे.एखाद्या पक्षात प्रवेश केल्यानंतरच आपण त्या पक्षाचे कार्यकर्ते होतो. चोरलेल्या पक्षा बरोबर जे स्वतः चोरीला गेले आहेत त्यांनी आम्हाला राजकीय ज्ञान देऊ नये. बाळासाहेबांचा आदेश होता,उद्धव साहेब यांच्या सोबत रहा, जे हा आदेश पाळू शकले नाहीत त्यांनी स्वतः ला शिवसैनिक म्हणून घेऊ नये.एखाद्या पक्ष प्रमुखाने काय भूमिका घ्यावी हा त्या पक्षप्रमुख यांचा अधिकार असतो... भाजप ने कश्मीर मध्ये मेहबुबा मुफ्ती सोबत युती केली म्हणून त्यावेळी आम्ही भाजपच्या लोकांनी भाजपच्या नेत्यांना असं का केलं म्हणून पक्ष फोडून बाहेर नाही पडलो... म्हणजे शिंदे गटाला भाजप ने केलेले चालतं आणि उद्धव साहेबांनी घेतलेले निर्णय चालत नाहीत... त्यामुळे माझ्यावर टीका करणाऱ्यांना करू द्या...एक दोन माणसे टीका करण्यासाठी ठेवलेली आहेत ती असू द्या...माझं लक्ष मात्र दिव्यातील जनतेसाठी आवाज उठवणे हेच आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५

**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

## दहावीच्या विद्यार्थ्यांचे अर्ज शाळांनी ऑनलाइन पद्धतीने भरावेत

**मुंबई :** सन २०२४ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज प्रचलित ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार आहेत. यासाठी सर्व माध्यमिक शाळाप्रमुखांनी विद्यार्थ्यांचे अर्ज नियमित शुल्कासह सरल डाटाबेसवरून सोमवार २० नोव्हेंबर २०२३ पर्यंत भरावेत, असे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या मुंबई विभागीय मंडळाचे सचिव डॉ. सुभाष बोरसे यांनी कळविले आहे.

# कैलेश पाटील यांच्या वतीने कोजागिरी पौर्णिमा उत्साहात साजरी










**लोकप्रिय माजी नगरसेवक शैलेश पाटील व समाजसेवक कैलेश पाटील यांच्या वतीने मुंब्रादेवी कॉलनी दत्तनगर येथे कोजागिरी पौर्णिमे निमित्त रास गरब्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विजेत्या स्पर्धकांना विशेष बक्षिसे प्रदान करण्यात आली.**

# दिव्यात गुजराती विकास मंडळातर्फे
## शरद पौर्णिमेचे भव्य आयोजन

**दिवा:-** दिव्याची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे, त्यात एक मध्यमवर्गीय गुजराती समाजही आहे, सुमारे ३००/४०० गुजराती कुटुंबे दिव्यात राहतात, हे सर्व गुजराती कोणत्या ना कोणत्या प्रकारे गुजराती समाजसेवक अशोक सोलंकी यांच्याशी संपर्कात आहेत.

गुजराती समाजासाठी सामाजिक कार्यक्रम किंवा समाजसेवेची एकही संधी श्री अशोक सोळंकी सोडत नाहीत, ते दरवर्षी (कोजागिरी) शरद पूनमच्या निमित्ताने गुजराती समाजाला एकत्र करण्यासाठी भव्य दांडिया रासचे आयोजन करतात. दर वर्ष प्रमाणी यंदाही गुजराती विकास मंडळ (दिवा) तर्फे भव्य गुजराती मेळावाचे आयोजन करण्यात आले. गुजराती परंपरेनुसार दांडिया रासचे आयोजन केले होते. विविध विभागात समाजसेवा केलेल्या मान्यवरांचा सन्मान करण्याबरोबरच दरवर्षी ठाण्यातील प्रसिद्ध शेठ श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) हे देखील या कार्यक्रमाला हजेरी लावतात.अशी माहिती अध्यक्ष अशोक सोळंकी यांनी दिली . दिव्यातील प्रत्येक राजकीय पक्षाचे नेते किंवा सामाजिक कार्यकर्ते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आपले योगदान देत आहेत.







दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि.३० ऑक्टोबर २०२३ पान : ४
www.diwanews.com

## नमो शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत राज्यातील ८५.६० लाख शेतकऱ्यांच्या खात्यात १७१२ कोटी रुपये

**मुंबई :** शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न प्राप्त व्हावे यासाठी केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेमध्ये दरवर्षी शेतकऱ्यांच्या खात्यावर ६ हजार रुपये थेट जमा करण्यात येतात. त्याच धर्तीवर राज्य सरकारने सुरू केलेल्या 'नमो शेतकरी सन्मान' योजनेचा शुभारंभ आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शिर्डी (जि. अहमदनगर) येथे करण्यात आला. राज्य सरकारच्या या योजनेमुळे केंद्र आणि राज्याचे मिळून शेतकऱ्यांना आता दरवर्षी १२ हजार रुपये मिळतील.

# शिवसेना ठाकरे गट आयोजित गणेशोत्सव सजावट स्पर्धेचा निकाल जाहीर





**दिवा:-**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व युवासेना दिवा शहर यांच्या माध्यमातून आयोजित केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव सजावट स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ सुमित हॉल दिवा येथे सुभाष भोईर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

या स्पर्धेमध्ये दिवा शहरातील ३० सार्वजनिक गणेशोत्सव मंडळानी सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये गणेशोत्सवाच्या देखाव्यातून सामाजिक संदेश,उत्कृष्ट सजावट, सण उत्सवाची परंपरा जपणे अशा विविध विषयांवर परीक्षण करून प्रथम, द्वितीय, तृतीय व दोन उत्तेजनार्थ यांस सन्मानचिन्ह व रोख रक्कम स्वरुपात बक्षीसे देवून प्रोत्साहित करण्यात आले.या स्पर्धेमध्ये अचानक मित्र मंडळ, दिवा हे प्रथम क्रमांक पटकावत विजयी झाले असून त्यांना सन्मान चिन्हे , रोख रक्कम व प्रशस्ती पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. द्वितीय साईनाथ मित्र मंडळ, दिवा तसेच तृतीय सिद्धिविनायक मित्र मंडळ, विजेते ठरले असून उत्तेजनार्थ सखाराम कॉम्प्लेक्स सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ व दिव्याचा सम्राट गणेशोत्सव मंडळ जाहीर करण्यात आले आहे. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व गणेशोत्सव मंडळांना सन्मानचिन्हे व प्रशस्तीपत्र देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी युवानेते सुमित सुभाष भोईर, युवा अधिकारी कल्याण जिल्हा प्रतिक पाटील दिवा उपशहर प्रमुख सचिन पाटील, वैष्णव पाटील तसेच रोहिदास मुंडे ,उप जिल्हा युवा अधिकारी स्वप्निल पावशे, उपशहर संघटिका प्रियांका सावंत ,योगिता नाईक, युवासेना दिवा शहर सचिव उमेश राठोड, युवासेना दिवा उप शहर अक्षय म्हात्रे , सोशल मीडिया समन्वयक विराज सुर्वे, विभागप्रमुख गुरुनाथ नाईक,चेतन पाटील, मच्छिंद्रनाथ लाड , राजेश भोईर, विभाग संघटिका स्मिता जाधव तसेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सर्व उपविभाग प्रमुख ,शाखाप्रमुख व युवासेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# दिवा येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहामध्ये संपन्न



**दिवा:-**धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन तथा अशोका विजयादशमीच्या निमित्ताने सिद्धार्थ बुद्ध विहार, दिवा येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहामध्ये संपन्न झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव मंडळ. दिवा या मंडळाचे अध्यक्ष आयु. एकनाथ भगत , कार्याध्यक्ष आयु. दिनेश पाटील , उपाध्यक्ष आयु मिलिंद गवई , महासचिव आयु. विजय पवार, सहसचिव आयु, नितीन रिंगणेकर , खजिनदार प्रदीप सपकाळ,गंगाधर गायकवाड,बापूसाहेब भोसले, प्रमुख संघटक आयु, बालाजी कदम, उपकार्याध्यक्ष अभिषेक जाधव ,नितिन् वाघमारे तसेच संपूर्ण महिला कमिटी सुद्धा मोठ्या संख्येने उपस्थित होत्या व दिवा विभागातील समाजातील माता भगिनी सुद्धा या कार्यक्रमाला हाजोराच्या संख्येने उपस्थित होत्या.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु, विजय पवार, व धम्म वंदना बौद्ध पूजा पाठ बौद्धाचार्य डी. के जाधव, बौद्धाचार्य विकास जाधव,बौद्धाचार्य नितीन रिंगणेकर यांनी पार पाडले. या ६७ व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त दिव्यामधील हजारो बांधव ,लहान मुले दिवा स्टेशाजवळील जय भीम स्तंभ येथे प्रथम बुद्ध वंदना घेऊन त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक दिवा शील रोड येथे पुष्पहार अर्पण करण्यात आले. व त्यानंतर सिद्धार्थ बुद्ध विहारात जाऊन धम्मवंदना ,तसेच अनेक मान्यवरांनी आपापले मनोगत व्यक्त केले.

## 'अग्निवीर' अक्षय गवते यांच्या कुटुंबाला राज्य शासनातर्फे १० लाख रुपयांची मदत

**मुंबई :** सियाचीनमध्ये कर्तव्य बजावताना महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्ह्यातील अग्निवीर अक्षय गवते यांचा मृत्यू झाला. अक्षयच्या मृत्यूबद्दल हळहळ व्यक्त करतानाच त्यांच्या कुटुंबियांना राज्य शासनातर्फे दहा लाख रुपयांची मदत जाहीर केल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. जवान अक्षय गवते हे बुलढाणा जिल्ह्यातील पिंपळगाव सराई येथील राहणारे होते. महाराष्ट्राच्या पहिल्या अग्निविराला वीरमरण आल्याने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. अक्षयच्या निधनाबद्दल त्याच्या कुटुंबियांप्रती मुख्यमंत्र्यांनी सहवेदना व्यक्त केली आहे.

# कोजागिरी पौर्णिमे निमित्त मनसे साबेगड शाखेतर्फे मोफत मसाला दुधवाटप

दिवा:-मनसेच्या साबेगड शाखेकडून शहराध्यक्ष तुषार भास्कर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विभाग अध्यक्ष देवेंद्र अशोक भगत यांच्या सहकार्याने शाखाध्यक्ष सयाजी चव्हाण यांनी कोजागिरी निमित्त साबे विभागातील नागरिकांसाठी मोफत मसाला दुधाचे वाटप करण्यात आले.

यावेळी मनसेचे दिवा शहर सचिव प्रशांत गावडे, विभाग सचिव परेश पाटील, केतन तांबे, मनविसे शहर सचिव चैतन्य गावडे, उपविभाग अध्यक्ष शैलेंद्र कदम, कार्यालय प्रमुख रमेश पाटील, शाखाध्यक्ष सागर निकम, विनायक गांवकर, महिला शाखाध्यक्ष नम्रता खराडे , राणी वाघमारे , विद्यार्थी संघटक अनिकेत परब, उपशाखाध्यक्ष मिथिल दुदवडकर, सागर गांवकर, प्रवीण धुरी, संदेश धनावडे, जुगल बारिया हे पदाधिकारी आणि महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.





# जिल्ह्यात वाढले नव्याने १ लाख २९ हजार ३७२ मतदार

**ठाणे:** ठाणे जिल्ह्यात जानेवारी ते ऑक्टोबर या दहा महिन्यात १ लाख २९ हजार ३७२ नव्या मतदारांची वाढ झाली आहे. यामध्ये पुरूष – ६५ हजार ६७२, स्त्री – ६३ हजार ६८१ व इतर १९ इतकी वाढ झाल्याने एकूण मतदारांची संख्या ६३ लाख ४३ हजार ८८९ इतकी झाली आहे. जिल्ह्यातील महिलांचे प्रमाण यामध्ये एकूण ३ ने वाढ झालेली आहे. तर मतदान केंद्रांच्या सुसूत्रीकरणादरम्यान १३३ मतदान केंद्र नव्याने तयार करण्यात आलेले असून त्यामध्ये ३६ मतदान केंद्र ही गृहनिर्माण सोयायटी मधील क्लब हाऊस हॉल मध्ये घेण्यात आलेली आहेत. याशिवाय,जिल्ह्यातील अंदाजे १५ लाख १६ हजार ८५३ इतक्या घरांना मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यामार्फत दिलेल्या भेटीदरम्यान ४७ हजार ७०९ एकूण मयत मतदार तर ४७ हजार ९३३ एकूण कायमस्वरूपी स्थलांतरित मतदार असल्याची माहिती पुढे आली आहे. या मयत व कायमस्वरूपी स्थलांतरित मतदारांबाबत सध्या सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमादरम्यान ११ ऑगस्ट २०२३ रोजीच्या पत्रात दिलेल्या निर्देशाचे पालन करून वगळण्यात येणार आहेत.

**असा असेल संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम**

**आगामी निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमामध्ये १) १८-१९ वयोगटातील मतदारांची नोंदणी, २) लक्षित घटकांची (तृतीय पंथी, बेघर, दिव्यांग मतदार) मतदार नोंदणी, ३) महिला मतदारांची नोंदणी विशेष करून भिवंडी व ऐरोली विधानसभा मतदारसंघामध्ये व इतर सर्व मतदारसंघामध्ये मतदार नोंदणीसाठी विशेष शिबिरे घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.**

भारत निवडणूक आयोगाकडील निर्देशानुसार ०१ जानेवारी, २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदारयादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम घोषित करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमामध्ये निवडणूक आयोगाने विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांच्या तारखांमध्ये बदल केला आहे. त्यानुसार ठाणे जिल्हयात २७ ऑक्टोबर २०२३ रोजी ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघाची एकत्रिकृत प्रारूप मतदारयादी जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय, संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांचे मध्यवर्ती कार्यालय (उढर), सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालय तसेच सर्व मतदान केंद्रावर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यामार्फत प्रसिद्ध केली जाणार आहे.

दरम्यान वाढलेल्या मतदारांमध्ये जिल्ह्यातील महिलांचे प्रमाण ३ ने वाढ झालेली आहे. ०५ जानेवारी, २०२३ रोजी महिलांचे प्रमाण (जेंडर रेषो) – ८४५ होते. २७ ऑक्टोबर २०२३ रोजी महिलांचे प्रमाण ८४८ इतका झालेला आहे. जिल्ह्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात मतदार नोंदणीचे गुणोत्तर ६५.४०% इतके झाले आहे. जिल्ह्यातील १८-१९ वयोगटातील मतदारांमध्ये एकूण २९ हजार १२४ इतकी वाढ झाली आहे. त्यामुळे आता १८-१९ वयोगटातील एकूण मतदारांची संख्या ७५ हजार २२३ इतकी झाली आहे. दिव्यांग मतदार नोंदणी मध्ये एकूण १ हजार २०६ इतकी वाढ झालेली आहे. आता जिल्ह्यात ३३ हजार ३३८ इतके दिव्यांग मतदार आहेत.

जिल्ह्यात एकूण १२ हजार ५७२ देह विक्रय करणाऱ्या महिला मतदारांची मतदार नोंदणी करण्यात आलेली आहे. तसेच ४ हजार ३३१ इतक्या असंरक्षित आदिवासी गटातील मतदारांची नोंदणी करण्यात आलेली आहे. ०६ जानेवारी, २०२३ पासून ते २७ ऑक्टोबर २०२३ एकत्रिकृत प्रारूप यादी प्रसिद्ध होईपर्यंत ठाणे जिल्ह्यात एकूण १ लाख ७६ हजार २४० इतके नमुना अर्ज – ६,७ व ८ एकत्रितरित्या प्राप्त झाले.

घरोघरी भेटी देवून मतदारांच्या पडताळणी दरम्यान ठाणे जिल्ह्यातील अंदाजे १५ लाख १६ हजार ८५३ इतक्या घरांना मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यामार्फत भेटी देण्यात आलेल्या आहे. या भेटीदरम्यान एकूण मयत मतदार ४७ हजार ७०९ व एकूण कायमस्वरूपी स्थलांतरित मतदार ४७ हजार ९३३ असल्याचे आढळून आलेले आहेत. या मयत व कायमस्वरूपी स्थलांतरित मतदारांबाबत सध्या सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमादरम्यान ११ ऑगस्ट २०२३ रोजीच्या पत्रात दिलेल्या निर्देशांचे पालन करून वगळणी करण्यात येणार आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि.३० ऑक्टोबर २०२३ | पान : ६



# हातखंबा तिठ्यावर थेट घरासमोर भला मोठा मोरीचा खड्डा



मोरीमुळे ग्रामस्थांच्या घराकडे येण्या-जाण्याचा मार्ग बंद होण्याची भीती

## स्थानिकांचा मोरीला विरोध

### काँक्रीटीकरण केलेल्या खड्ड्याच्या ठिकाणी मोरीचे बांधकाम करा

### स्थानिकांची प्राधिकरण विभागाकडे निवेदनातून मागणी

**रत्नागिरी /प्रतिनिधी :** मिऱ्या नागपूर महामार्गाचे काम हातखंबा येथून जोमात सुरू आहे. साळवी स्टॉप पासून सर्व अनधिकृत बांधकामे तोडण्यात आली आहे. तर काहींनी स्वतः हून आपली दुकाने बाजूला केली आहे. पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी ठिकठिकाणी मोऱ्या पाडण्याचे काम सुरू आहे. मात्र हातखंबा तिठ्यावरील एका घरासमोर थेट मोरीचां खड्डा पाडण्याचे काम सुरू आहे.

साळवी स्टॉप ते हातखंबा या भागात सर्व्हिस रोडच्या बाजूने खोदाई करून सपाटीकरण सुरू आहे. काही ठिकाणी खोलगट भाग आहे. त्याठिकाणी डंपरच्या सहाय्याने दुसऱ्या ठिकाणाहून माती आणून भराव टाकून रस्त्याची लेव्हल करण्यात येत आहे. तसेच पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी मोऱ्यासाठी खड्डे देखील पाडले जात आहेत. हे काम हातखंबा तिठ्यापासून पुढे रत्नागिरीच्या दिशेने मोठ्या प्रमाणात सुरू आहे. मात्र हातखंबा तिठ्यावरील भागात एका घरासमोरच भला मोठा खड्डा पाडून मोरी उभारण्याचे प्राधिकरण विभागाचे नियोजन सुरू आहे. दोन दिवसांपूर्वी घराच्या समोर खड्डा न काढता एका बाजूला पाडण्यात आला होता. मात्र ज्यांच्या जागेत मोरीसाठी खड्डा पाडण्यात आला त्या जमीन मालकांनी प्राधिकरण विभागाला अर्ज केला व प्राधिकरण विभागाच्या टेकनिकल टीमचे गणित बिगडवले. मूळात प्राधिकरणाच्या टेकनिकल टीमने पाण्याचा योग्य प्रकारे निचरा होईल अशाच ठिकाणी मोरीसाठी खड्ड्यांची खोदाई केली होती. मात्र जागेमालकाच्या सांगण्यावरून दोन दिवसात खोदाई करून पूर्ण झालेला खड्डा बुजवून थेट एका घरासमोर भला मोठा नवीन खड्डा खोदाई करून त्याठिकाणी मोरीचे काम सुरू आह. रातोरात अचानक मोरीच्या खड्ड्यात बदल करून घराच्या समोरच खोदाई करत असल्याने घरमालकानी मोरीला विरोध दर्शवला आहे.

**जाण्या-येण्याचे मार्ग बंद करणार का?**

थेट घरासमोर खोदाई करत असलेले मोरीचे काम प्राधिकरण विभागाने तातडीने थांबवावे, टेकनिकल टीमच्या योग्य अंदाजाप्रमाणे पहिल्यांदा जिथे खड्डा खोदाई करून काँक्रीटीकरण केले आहे त्याच ठिकाणी मोरी करावी अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ कपिलानंद कांबळे यांनी निवेदनाद्वारे प्राधिकरण विभागाला केली आहे. टेकनिकल टीमने किंवा प्राधिकरण विभागाने कोणाचीही मर्जी राखण्यासाठी आपल्या कामाची दिशा बदलू नये. खोदाई करून पूर्ण झालेला खड्डा बूजवून थेट घरासमोर नवीन खड्डा खोदून स्थानिक ग्रामस्थांच्या घरांकडे जाण्या-येण्याचे मार्ग आता प्रशासन बंद करनार का? असा सवाल ही कांबळे यांनी आता उपस्थित केला आहे.

---

# क्रशरविरोधात वांद्री येथील ग्रामस्थ आक्रमक

### कायमस्वरूपी तोडगा काढा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा

**संगमेश्वर / प्रतिनिधी :-** संगमेश्वर तालुक्यातील वांद्री येथे ११ खाणी असून याठिकाणी ब्लास्टिंग द्वारे काळ्या दगडाचे उत्खनन गेले कित्येक वर्ष सुरु आहे. या ब्लास्टिंग मुळे वांद्री गावातील घरांना तडे गेले आहेत. तसेच धुळीमुळे आंबा, काजू बागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. ब्लास्टिंग मुळे पाण्याचे स्रोत आटले आहेत. या प्रकारला कंटाळून ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. या पत्रात त्यांनी कायमस्वरूपी तोडगा काढा अन्यथा उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

या पत्रात त्यांनी म्हटले आहे कि, वांद्री येथे एकूण ११ खाणी कार्यरत आहेत.या सर्वच खाण मालकांकडून दर दिवशी आळीपाळीने मोठ्या प्रमाणात ब्लास्टिंग केली जाते.या साठी बोर ब्लास्टिंग सारखी पद्धत वापरली जात असून अतिशय मोठ्या खोलीचे खड्डे मारून स्फोटाद्वारे दगड उत्खनन केले जाते. आजपर्यंत या समस्येवर वारंवार चर्चा ग्रामपंचायत पातळीवर झाली आहे.परंतु व्यावसायिकांनी त्यांच्या कार्यपद्धतीत कोणताही सकारात्मक बदल केलेला दिसून आलेला नाही.परिणामी गावातील ग्रामस्थांची घरे दिवसेंदिवस खिळखिळी होत असून यामुळे ग्रामस्थांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.याबरोबरच या हादऱ्यामुळे नागरी वस्तीतील पाणी पुरवठा करणारे नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत नष्ट होत असून दिवसेंदिवस पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे.

या समस्येतून कायमस्वरूपी सुटका होण्यासाठी वांद्री गावाच्या हद्दीतील सर्व दगड खाणी कायम स्वरूपी बंद करण्यात याव्यात अशी मागणी या पत्राद्वारे करण्यात आली आहे. यावर ग्रामपंचायत सदस्यांसह सर्व ग्रामस्थांच्या सह्या आहेत. याबाबत आपल्या पातळीवर निर्णय न झाल्यास आम्ही उग्र आंदोलन करणार आहोत, असेही म्हटले आहे. तरी या समस्येवर कायम स्वरूपी तोडगा काढण्याची मागणी पत्रद्वारे केली आहे.

---



## राजापूर बाकाळे समुद्रकिनारी सापडला २० किलोचा कोकेर मासा

**राजापूर:-** तालुक्याच्या पश्चिम भागातील अनेक गावांमधून मासे पकडण्यासाठी फावल्या वेळात अनेक जण समुद्रकिनारी जात असतात. पाकाळे गावातील राहुल वामन राऊत याला बारा फुट लांब, नऊ किलो वजनाची दांडोशी, तर कोकेर मासा गळाला लागला. राहुल याला वीस किलो वजनाचा कोकेर मासा गळाला लागला. त्याने तो साखरी नाटे येथील विक्री केंद्रावर नेऊन विकला त्याला १८० रुपये किलोचा दर मिळाला आहे. सध्या या परिसरात गरीला २० किलो वजनाचा मिळालेल्या माशाची चर्चा सुरू असून कौतुक ही होत आहे.

---

## रत्नागिरी नगरपरिषदेवर काँग्रेसने केला हल्लाबोल

**रत्नागिरी :** रत्नागिरी नगरपरिषद म्हणजे भ्रष्टाचाराचे मुख्य केंद्र असा आरोप काही दिवसा पूर्वी काँग्रेसने केल्या नंतर दिलेल्या निवेदनाचा पाठ पुरावा करण्यासाठी काँग्रेस पदाधिकारी आणि सामान्य जनता एकत्र जमून नगरपरिषद अधिकारीना विचारला गेला जाब.तद्प्रसंगी बोलताना कपिल नागवेकर यांनी रत्नागिरी नगर परिषद हद्दीतील शिवाजी स्टेडियम मधिल चालू असलेला भ्रष्टाचार ह्याचा निवेदनाचा कोणाताच प्रतिसाद दिला गेला नाही.त्यामुळे जनते मध्ये असंतोष पसरला आहे. कंत्राटदार आपल्याच पद्धतीने कामे काढत आहेत त्यांना विचारणा केली असता नगरपरिषद अधिकारी व आम्ही ठरवून कामे काढतो अशी उत्तरे मिळत आहेत. तसेच तीन महिन्यापूर्वी किल्ला विभागामध्ये साळवी यांच्या घरा मागचे जनतेचे लाखो रुपये खर्च करून गटाराचे काम केले गेले होते परंतु ते कोसळले अश्या परिस्थितीत सुद्धा त्या कत्राटदाराचे पेमेंट केले जाते. अश्या गोष्टीमुळे राजरोस भ्रष्टाचार होत असल्याचा प्रचंड सभ्रम जनते मध्ये होत आहे. ह्याचा ए ओ माने साहेब ह्यांना विचारणा करण्यात आली तसेच रत्नागिरी नगरपरिषद सी ओ बाबर साहेब नगरपरिषद मध्ये उपस्थित नसल्यामुळे त्यांच्याबरोबर फोन वरून चर्चा करण्यात आली. त्यावेळेस ओबीसी विभाग प्रदेश उपाध्यक्ष दीपक राऊत यांनी शिवाजी स्टेडियम येथे देखभालच्या नावावर सामान्य जनतेचे हजारो रुपये खर्च होतात मग देखभाल काय होते हा निव्वळ भ्रष्टाचार आहे असा आरोप काँग्रेस तर्फे दीपक राऊत यांनी केला. त्यावेळेस आम्ही तुम्हाला दोन दिवसात लेखी आश्वासक उत्तर देऊ असे समर्पक उत्तर मिळाल्यावर काँग्रेस पदाधिकारी यांनी नगरपरिषद मधून माघार घेतली. तद्प्रसगी महिला जिल्हाध्यक्षा अॅड अश्विनी आगाशे, प्रदेश सचिव सुस्मीता सुर्वे, विधानसभा क्षेत्र अध्यक्ष सचिन मालवणकर, तालुका सरचिटणीस काका तोडणकर,प्रमोद सक्रे, सुबोध कुंटे,कैलास कुबल,दर्शन सक्रे, इत्यादी कार्यकर्ते व काँग्रेस प्रेमी उपस्थित होते.

---



## आशा सेविकांचे रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयापुढे रास्ता रोको आंदोलन

**रत्नागिरी :** दरमहा किमान वेतन, ऑनलाईन कामाची सक्ती नको, दिवाळी व भाऊबीज भेटीसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी आशा, गटप्रवर्तक यांनी सुरू केलेल्याची संपाची दखल राज्यस्तरावरून घेत नसल्यामुळे संघटना आक्रमक झाली आहे. कामबंद पाठोपाठ आता शुक्रवारी (ता. २७) जिल्हाधिकारी कार्यालयापुढे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. शेकडो आशा जिल्हा परिषदेत एकवटल्या. तिथून त्या जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकल्या. गेली अनेक वर्षे आशा व गटप्रवर्तक महिला आपल्या विविध मागण्यांसाठी वारंवार आंदोलन करत आहेत. पुन्हा एकदा मागण्यांसाठी एल्गार केला आहे. १७ ऑक्टोबरला जिल्हा परिषदेवर मोर्चा काढत १८ ऑक्टोबरपासून बेमुदत कामबंद संप करण्याचा इशारा दिला होता. त्यानुसार हा संप सुरू झाला आहे. सोमवारी यावर तोडगा न निघाल्यामुळे सलग सहा दिवस हा संप सुरूच आहे. याचा परिणाम थोड्या ओके फार प्रमाणात ग्रामीण भागातील आरोग्ययंत्रणेवर जाणवू लागला आहे. आशा व गटप्रवर्तक महिलांना दरमहा २६ हजार रुपये किमान वेतन, गटप्रवर्तक महिलांना दरमहा ८ हजार ४५० रुपये, स्वतंत्र प्रवास भत्ता, ऑनलाईन कामाची सक्ती करणे बंद करा, दिवाळीपूर्वी सर्व आशा व गटप्रवर्तक महिलांना किमान ५ हजार रुपये दिवाळी भाऊबीज द्या, अशा प्रमुख मागण्या आहेत.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि.३० ऑक्टोबर २०२३


## विहीरीत पडलेल्या भटक्या श्वानास मिळाले जीवदान

**ठाणे:** चरई, ब्राम्हण शाळेजवळील विहीरीमध्ये पडलेल्या एका भटक्या श्वानाला सुखरूप बाहेर काढून जीवदान देण्यात ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचाऱ्यांना यश आले आहे. ही घटना सोमवारी सकाळी समोर आली असून त्या श्वानाला कोणतीही दुखापत झाली नसल्याचे सांगण्यात आले. तसेच तो पडला की कोणी त्या श्वानाला विहीर ढकलले हे समजू शकले नाही. अशी माहिती सूत्रांनी दिली. तर अशाप्रकारे श्वानाला त्रास देऊ नये, अशी मागणी श्वान प्रेमींकडून करण्यात आलेली आहे.




**दिवा पोलिस चौकीला रोटरी क्लब ऑफ दिवा ठाणे यांच्या कडून वॉटर प्युरीफाय भेट देण्यात आला. त्यावेळी तो वॉटर प्युरीफाय दिवा चौकीचे सहाय्यक पोलीस निरिक्षक शहाजी शेळके यांच्या कडे रोटरी क्लब ऑफ दिवा ठाणे यांच्या टिम ने सुपूर्द केला. याप्रसंगी रोटरी क्लब ऑफ दिवा ठाणेच्या वतीने अध्यक्ष हर्षद भगत, स्वप्नील गायकर, अभिषेक ठाकूर, साईनाथ म्हात्रे, किशोर पाटील, प्रतीक बेडेकर, युवराज बेडेकर, विकास गुंजाळ उपस्थित होते.**

## ठाण्यातील १९ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार




**ठाणे :** ठाणे महापालिका शिक्षण विभागातर्फे सोमवारी ठाणे महापालिका कार्यक्षेत्रातील महानगरपालिका शाळांमधील १४ आणि खाजगी शाळांमधील ०५ अशा एकूण १९ शिक्षकांचा 'आदर्श शिक्षक पुरस्कार २०२३' देऊन गौरव करण्यात आला. माजी महापौर मिनाक्षी शिंदे, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त उमाकांत गायकवाड यांच्या हस्ते या शिक्षकांचा गडकरी रंगायतन येथे सन्मान करण्यात आला.

माजी महापौर मिनाक्षी शिंदे यांनी सर्व पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे कौतुक केले. शिक्षकांवर पडणाऱ्या अतिरिक्त कामांचा उल्लेखही त्यांनी केला. तसेच, समाजातील शिक्षकाचे स्थान अबाधित असून त्यांचे कार्य खूपच महत्त्वाचे असल्याचे त्या म्हणाल्या. ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी आणि अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे यांनीही सर्व पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे अभिनंदन केले. शिक्षण ही समाजाची प्राथमिक गरज आणि प्रशासनाचे आद्यकर्तव्य आहे, असे प्रतिपादन रोडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या पूर्वार्धात शिक्षणतज्ज्ञ, व्याख्याते आणि समुपदेशक, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे माजी सहाय्यक आयुक्त अनिल गुंजाळ यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी सद्यस्थितीतील शिक्षण पद्धती आणि सामाजिक परिस्थितीचा आढावा घेत शिक्षकांनी सर्वस्तरातील विद्यार्थ्यांना उत्तम माणूस घडविण्यासाठी जास्तीतजास्त प्रयत्न करण्याबाबत विवेचन केले. ती आजच्या काळाची गरज असल्याचे सांगत, त्यासाठी शाळा, शिक्षक आणि शिक्षणपद्धती कटिबद्ध असल्याचे सांगितले. त्यांनी ओघवत्या शैलीत शिक्षकांना जबाबदारी आणि कर्तव्याची जाणीव करून दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ठाणे महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी केले. त्यांनी ठाणे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सुरू असलेल्या वेगवेगळ्या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली. गटाधिकारी संगीता बामणे यांनी संयोजन केले. कार्यक्रमाच्या सुरूवातील शाळा क्र. ६४ मधील विद्यार्थीनींनी स्वागतगीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गट प्रमुख प्रेरणा कदम, सविता चौधरी, सुरेश पाटील यांनी केले. तर, नुतन बांदेकर यांनी आभार मानले.

# डॉ. श्रीकांत शिंदे यांची वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी निवड

## संघटनेच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत निवड




**ठाणे –** भारतातील फुटबॉल खेळाचे नियमन करणाऱ्या नामांकीत ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशनशी संलग्न असलेल्या आणि महाराष्ट्रात फुटबॉलचे नियमन करणाऱ्या ''द वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनच्या'' कार्यकारी समितीच्या बैठकीत कल्याण लोकसभा मतदारसंघाचे *खासदार डॉ.श्रीकांत एकनाथ शिंदे* यांची *उपाध्यक्षपदी* निवड करण्यात आली आहे. या संघटनेचे अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांच्या अध्यक्षतेखाली आणि कार्यकारी समितीच्या उपस्थितीत शनिवारी मुंबईत झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली.

''द वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन ही संस्था भारतात फुटबॉल खेळाचे नियमन करणाऱ्या नामांकीत ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशनशी संलग्न आहे तर, महाराष्ट्रात फुटबॉलचे नियमनही या संस्थेमार्फत करण्यात आले आहे. महाराष्ट्रात आणि देशात फुटबॉल खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि खेळासाठी आवश्यक गोष्टींची उभारणी करण्यासाठी काम करणारी ही सर्वात जुनी संस्था असून १९११ पासून कार्यरत आहे. देशातील सर्वात जुनी दुसरी स्पर्धा असलेल्या रोव्हर्स कपची सुरुवात संस्थेच्या स्थापनेपूर्वीच झाली होती. राज्यातील फुटबॉल खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी आणि तसेच त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेमार्फत विविध ठिकाणी स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धांच्या माध्यमातून अनेक गुणवंत खेळाडूंना अनेक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळण्याची संधी मिळाली आहे. या संघटनेच्या उपाध्यक्षपदी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. ''द वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनच्या'' कार्यकारी समितीची शनिवारी मुंबई येथे बैठक पार पडली. या बैठकीत संघटनेचे अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांच्या अध्यक्षतेखाली आणि कार्यकारी समितीच्या उपस्थितीत हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात आणि देशात फुटबॉलसाठी अत्याधुनिक सोयीसुविधा आणि पोषक वातावरण निर्माण करण्यात नक्कीच योगदान देण्याचा प्रयत्न राहणार असून ग्रामीण भागातील खेळाडूंना फुटबॉलच्या मुख्य प्रवाहात आणण्याला प्राधान्य असल्याच्या भावना यावेळी खासदार डॉ. शिंदे यांनी व्यक्त केल्या आहेत.

या बैठकीला संघटनेचे उपाध्यक्ष छत्रपती मालोजीराजे, सुनील धांडे, विश्वजीत कदम, हरेश वोरा, किरण चौगुले, ए. सलीम परकोटे, सहसचिव आणि कार्यकारी समितीस सदस्य उपस्थित होते.

दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

सोमवार, दि.३० ऑक्टोबर २०२३ 

www.diwanews.com

## एसी युनिटला आग; देवघरातील कापसाची गादी जळाली

**ठाणे:** तलावपाली जवळ, डॉ. मूस रोड, या ठिकाणी असलेल्या नौका विहार या इमारतीच्या बी विंग मधील चौथ्या मजल्यावरील रूममधील एसी युनिटला आग लागल्याची घटना सोमवारी मध्यरात्री तीन वाजण्याच्या सुमारास समोर आली. या आगीत देवघरातील कापसाची गादी व पूजेचे काही साहित्य तसेच एसी पूर्णपणे जळून नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेत सुमारे अर्ध्या तासात आगीवर नियंत्रण मिळविण्यात त्यांना यश आले.


# ठाण्यातील पार्किंग समस्या व वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आयआयटी मार्फत सर्वेक्षण करा

## भाजपचे कृष्णा पाटील यांची मागणी

**ठाणे:–** ठाणे शहरातील पार्किंग व वाहतूक कोंडीच्या अनुषंगाने अभ्यास करून त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी मुंबई आयआयटीच्या माध्यमातून सर्वेक्षण करण्यात यावे अशी लेखी मागणी ठाणे भाजपचे माजी नगरसेवक कृष्णा पाटील यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.

याबाबत कृष्णा पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की,मुंबई लगतचे वाढते शहर म्हणून ठाणे झपाट्याने विकसित होत आहे.या वाढत्या शहरात मागील १५ वर्षात ट्रॅफिक आणि पार्किंगचा प्रश्न गंभीर बनला आहे.ठाणे शहर आणि महापालिका हद्दीत अनेक भागात वाहतूक कोंडी आणि पार्किंग समस्येमुळे नागरिकांना गैरसोयी होत आहेत.यावर कायमस्वरूपी व दूरचा विचार करून तोडगा काढणे आवश्यक असून येथील ट्रॅफिक व पार्किंग समस्या सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यासाठी राज्य शासनाने मुंबई आयआयटीच्या माध्यमातून सर्वेक्षण करावे अशी मागणी पाटील यांनी या पत्रातून केली आहे. आयआयटी, मुंबई ने सर्वेक्षण करून या समस्येवर तोडगा सुचवावा. यासाठी राज्य शासनाने आयआयटी, मुंबई ची एक कमिटी नियुक्त करावी अशी विनंती कृष्णा पाटील यांनी राज्य शासनाला केली आहे.

> *ठाण्यात वाढती लोकसंख्या, वाहन संख्या आणि अपुरे रस्ते लक्षात घेऊन वाहतुककोंडी व पार्किंग यावर कायमस्वरूपी तोडगा काढणे आवश्यक आहे,त्यासाठी आयआयटीच्या माध्यमातून सर्वेक्षण व्हावे अशी मागणी केली आहे.*
>
> *– कृष्णा पाटील,* भाजप



कृष्णा दादू पाटील
नगरसेवक प्रभाग क्र. ११ (क)
ठाणे महानगरपालिका, ठाणे
महापालिका भवन, सरसेनानी जनरल अरुण कुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पांचपाखाडी, ठाणे (प) ४००६०१

दिनांक : 05/10/2023

प्रति,
मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब,
उपमुख्यमंत्री, ( महाराष्ट्र राज्य ).

**विषय : ठाणे शहरातील पार्किंग व वाहतूक कोंडी च्या अनुषंगाने आयआयटीच्या माध्यमातून सर्वेक्षण करणे बाबत.**

**महोदय,**

मुंबई लगतचे वाढते शहर म्हणून ठाणे झपाट्याने विकसित होत आहे. या वाढत्या शहरात मागील १५ वर्षात ट्रॅफिक आणि पार्किंगचा प्रश्न गंभीर बनला आहे. ठाणे शहर आणि महापालिका हद्दीत अनेक भागात वाहतूक कोंडी आणि पार्किंग समस्येमुळे नागरिकांना गैरसोयी होत आहेत.

यावर कायमस्वरूपी व दूरचा विचार करून तोडगा काढणे आवश्यक असून येथील ट्रॅफिक व पार्किंग समस्या सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यासाठी राज्य शासनाने मुंबई आयआयटीच्या माध्यमातून सखोल सर्वेक्षण करावे. तसेच आयआयटी, मुंबई ने सर्वेक्षण करून या समस्येवर तोडगा सुचवावा. यासाठी राज्य शासनाने आयआयटी, मुंबईची एक कमिटी नियुक्त करावी ही विनंती!

धन्यवाद !

11.10.23
लिपिक
उपमुख्यमंत्री यांचे कार्यालय
महाराष्ट्र शासन
...ालय, मुंबई

O/C

आपला विश्वासू,
कृष्णा दादू पाटील
मा. नगरसेवक प्र.क्र. ११ (क).

निवास : अे - २/१०३-१०४, गोल्डन पार्क, गोकुळनगर, ठाणे (प) ४००६०१
कार्यालय पत्ता : पाटील हाऊस, जरीमरी मंदीराच्या शेजारी, जुना आग्रा रोड, गोकुळनगर, ठाणे (प) ४००६०१

# मराठा आरक्षणाला संपूर्ण पाठिंबा –खासदार सुनील तटकरे

**ठाणे:** आगामी लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीतील भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस हे तिन्ही पक्ष, महाराष्ट्रात मिशन ४५ + मोहीम राबविणार आहे. तिन्ही पक्षाचे राज्यस्तरीय व केंद्रस्तरीय नेते महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकीतील जागा वाटपाचा एकत्रित निर्णय घेणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष, खासदार सुनील तटकरे यांनी ठाण्यात रविवारी सांगितले. तसेच मराठा समाजाला कायद्याच्या आधारावर आरक्षण देण्यासाठी आमचा संपूर्ण पाठिंबा आहे, असे त्यानी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

रविवारी ठाणे राष्ट्रवादी काँग्रेसच्या मध्यवर्ती कार्यालयात कार्यकर्त्यांच्या भेटीसाठी खासदार तटकरे हे ठाण्यात आले होते. यावेळी पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रवक्ते ठाणे व पालघर समन्वयक, ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे, ठाणे राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा सरचिटणीस प्रभाकर सावंत, रविंद्र पालव, मा. नगरसेविका वहिदा खान, अंकिता शिंदे, ठाणे राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या अध्यक्षा वनिताताई गोतपागर, ठाणे राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष विरु वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

आगामी लोकसभा निवडणुक भारतीय जनता पक्ष, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस हे महायुतीतील तिन्ही पक्ष एकत्रित लढणार आहेत. महाराष्ट्रात मिशन ४५+ ही मोहीम आम्ही राबविणार आहोत. योग्यवेळी तिन्ही पक्षातील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्यस्तरीय टीम, जसे राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने प्रदेशाध्यक्ष म्हणून मी स्वतः, केंद्रीय नेते प्रफुल्लभाई पटेल तसेच दोन्ही पक्षातील केंद्रस्तरीय नेते हे एकत्रित बसून महाराष्ट्रातील लोकसभा जागेबाबत निर्णय घेतील व



तो आम्हा तिन्ही पक्षांना मान्य असेल. दिवाळीपूर्वी मी महाराष्ट्र दौरा करणार आहे तर दिवाळीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार हे महाराष्ट्राचा दौरा करणार आहेत. या दौऱ्यातुन महाराष्ट्रातील जनतेशी संवाद साधणार आहेत अशी माहिती खासदार तटकरे यांनी दिली.

मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, अशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्पष्ट भूमिका आहे. कायद्याच्या कक्षात, न्यायालयीन निर्णयाच्या आधारावर मराठा समाजाला आरक्षण मिळायलाच हवे, तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या व तत्कालीन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली आघाडी सरकारमध्ये मी मंत्री असताना मराठा समाजाला आरक्षण देण्यात आले होते. तसेच अल्पसंख्याक समाजालाही ५ टक्के आरक्षण देण्यात आले होते. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या घटनात्मक बाबींवर हे आरक्षण काही टीकले नाही, नारायण राणे यांच्या नेतृत्वाखाली राणे समितीने संपूर्ण राज्यातील मराठा समाजाची सांख्यिकी माहिती जमा केली होती. यानंतर देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारनेही तसेच उद्धव ठाकरे यांच्या सरकारनेही आरक्षणासाठी प्रामाणिक प्रयत्न केले होते. आजही जरांगे पाटील यांच्या आरक्षणाच्या मागणीला आमचा जाहीर पाठिंबा आहे. मराठा समाजाला यासाठी आंदोलन करण्याचा संविधानाने अधिकार दिलेला आहे, इतरही समाजाची आरक्षणाची मागणी आहे. त्याचेही आम्ही समर्थन करतो. पण आरक्षण कायद्याच्या व न्यायालयाच्या आधारावर टीकावे हीच आमची स्पष्ट भूमिका असल्याचेही ते म्हणाले.

भाजप, शिवसेना यांच्याबरोबर अजितदादांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महाराष्ट्राच्या विकासाच्या तळमळीतून सत्तेत सहभागी झाला आहे. पण सत्तेत सहभागी होताना शिव, फुले, शाहू, आंबेडकर विचारधारा आम्ही अजिबात सोडलेली नाही किंवा धर्मनिरपेक्षताही सोडलेली नाही. सत्तेत आल्यावर उपमुख्यमंत्री अजितदादा यांनी सर्वसामान्यांची कास धरणारे घेतलेले गतीमान निर्णय याची साक्ष आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या मान्यतेचा दावा निवडणूक आयोगाकडे दाखल झाला आहे. सर्वोच्च न्यायालयानेही निवडणूक आयोगाचा घटनात्मक दर्जा मान्य केला आहे. निवडणूक आयोग योग्य तो निर्णय घेईल. त्याचा सर्वांनी सन्मान करायला हवा, असेही खासदार तटकरे म्हणाले.